आपल्या आवडत्या १० गाण्यांसंबंधी बोलताना रफी नेहमी ज्या गीतांचा आवर्जून उल्लेख करायचा ते 'मैंने चाँद और सितारों की तमन्ना की थी' हे त्याचं लाडकं गाणं. साहिरची अर्थपूर्ण रचना, त्यात उमटलेला एका भग्नहृदयी प्रियकराचा निराशावाद आणि त्याला साजेशी सुरेख चाल. या सर्वांचा अतिशय मनोज्ञ संगम या गाण्यात झालेला दिसून येतो. जाणकार रसिकांनी नेमक्या याच गोष्टी हेरल्या आणि ते कुठल्या चित्रपटातलं आहे किंवा कोणत्या संगीतकाराने त्यावर स्वरसाज चढवला आहे याची त्यांनी फारशी दखलही घेतली नाही. अगदी आजपर्यंत त्या गाण्याची रसिकमान्य लोकप्रियता अबाधित राहिलीय.

निर्माते-दिग्दर्शक जी. पी. सिप्पीची ओळख ही आजच्या पिढीला तरी 'शोले'वाला सिप्पी अशीच आणि एवढ्यापुरतीच मर्यादित आहे. फार तर त्या आधीचे 'बंधन', 'सीता और गीता' वगैरे चित्रपट काहींना ठाऊक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याच जी. पी. सिप्पींनी निर्मिलेला 'चंद्रकांता' हा पोषाखीपट १९५६ साली पडद्यावर आला होता. देखणी बीना राय त्यात शीर्षक भूमिकेत चमकलेली होती आणि तिच्या जोडीला होता भारतभूषण. सिप्पींच्या स्वत:च्याच काल्पनिक कथेवर बेतलेल्या या चित्रपटात कुठलंसं राजगड हे संस्थान दाखविलेलं. आनंदी, सुखी आणि समाधानी प्रजेने ते नांदत असताना जुलमी वीरजाल (हीरालाल) स्वत:च्या बळावर अन्यायाने ते काबीज करतो. सबंध राज्य बळकावून त्यावर आपली सत्ता प्रस्थापित करतो. विलासी आणि मद्यपि वीरजालची नजर मग राजगडची राजकन्या चंद्रकांता हिच्यावर पडते. आपलं तिच्याशी लग्न करून द्यावं असा प्रस्ताव तो पराभूत राजाकडे मांडतो खरा. पण हा रजपूत जरी हतबल झालेला असला तरी वीरजालची ती मागणी फेटाळून लावतो. चंद्रकांताच्या मोहक सौंदर्याने घायाळ झालेला वीरजाल मग चिडून तिच्यादेखत राजाचा खून करतो. आपल्या डोळ्यादेखत पित्यावर झालेल्या त्या अनन्वित अत्याचाराने बिथरून गेलेली चंद्रकांता मग त्याच्या मृतदेहापाशीच सूडाची शपथ घेते आणि पित्याची तलवार घेऊन वीरजालचा खातमा करण्याची प्रतिज्ञा करते.

अर्थात् ही गोष्ट वीरजालच्या पूर्णपणे ताब्यात असलेल्या राजवाड्यात राहून पूर्ण होणं शक्यच नव्हतं. म्हणून मग ती राजवाड्यातून पलायन करते आणि दूरवरच्या एका जंगलात असलेल्या आश्रमात आसरा घेते. तिथला वयोवृद्ध गुरू चंद्रकांताचं सांत्वन करून चार धीराच्या गोष्टी सांगतो. त्याच आश्रमात राहत असलेला एक तरुण कवी कुणाल तिच्या सान्निध्यात येतो आणि दु:खी, एकाकी चंद्रकांता नकळत त्याच्याकडे आकर्षिली जाते.

इकडे चंद्रकांताच्या गमनानंतर

चंद्रकांता



वीरजालला मोकळं रान मिळतं. तो आणि त्याचे अनुयायी प्रजेवर वाटेल तशी हुकूमत गाजवू लागतात. वीरजालला तर आपण जणू सर्वज्ञ, साक्षात् परमेश्वरच आहोत, असं वाटू लागतं आणि राज्यातील देवळांची मोडतोड करून तो त्यात आपला पुतळा बसवून लोकांना त्याची पूजा करा असा हुकूम सोडतो.

वीरजालच्या या वाढत्या अत्याचाराने लोकांची सहनशीलता संपुष्टात येते. आश्रमातील गुरूच्या कानी या गोष्टी येताच तो चंद्रकांताला तिच्या प्रतिज्ञेची आठवण करून देतो. आपला प्रियकर कुणाल याच्या वीरजालला ठार मारते आणि आपल्या प्रियकरासमवेत सुखाने राज्य करू लागते.

कमालीची नाट्यपूर्ण असणारी ही मूळ कथा प्रत्यक्ष पडद्यावर मांडताना सिप्पीसाहेबांनी मात्र बाळबोध घेण्याचा विसर पडावा आणि गुरूने तिला त्याची आठवण करून द्यावी? चित्रपटाच्या क्लायमॅक्सला वीरजालचा पाडाव करताना आपल्या पित्याच्या तलवारीने त्याचा अंत करण्याऐवजी तो कड्यावरून

मैने चाँद और सितारों की तमन्ना की थी...

बॅनर : सिप्पी फिल्म्स् लि.

कलाकार : बीना राय, भारतभूषण, हीरालाल, बिपिन गुप्ता, बी. एम्. व्यास, राजन कपूर, शिवराज, जॉनी वॉकर.

निर्माता/दिग्द. : जी. पी. सिप्पी.

गीतकार : साहिर लुधियानवी.

संगीत : एन्. दत्ता.

प्रदर्शन : शुक्रवार, २७ जुलै १९५६.

गाणी :

१) मस्त होकर जरा झूमले, हुस्न की वादियों में घूम ले... - आशा/कोरस.
२) किस्मत अगर है साथ तुम्हारे तो क्या हुआ... - आशा.
३) मैने चाँद और सितारों की तमन्ना की थी (भाग १) - रफी.
४) जी चाहता है आज कहीं दूर जाइए, दुनिया पुकारती रहे... - रफी/आशा.
५) मेरी राहों से जुदा हो गयी राहें उनकी (भाग २) - रफी.
६) लाख बार धिक्कार है... मैं नहीं मानूँगा माटी के पुतले को भगवान... - रफी.
७) स्वामी तेरे दर्शन को आई ब्रजबाला... - गीता दत्त/कोरस.
८) मुझको लगा है साल सोलहवा, हाय नहीं छेड़ना.... - शमशाद बेगम.
९) जिंदगी तंग है, मेरे शेरो उठो, ऐ दिलेरो उठो... - रफी/आशा/कोरस.

मदतीने ती राज्यात प्रवेश करते. लोकांमध्ये वीरजालविरुद्ध बंडाची भावना निर्माण करते आणि सर्व प्रजा एक होऊन वीरजालवर चालून जाते. सगळं प्रकरण अंगलट आल्याचं पाहून बिथरलेला वीरजाल जीव वाचविण्यासाठी त्यानेच उभारलेल्या देवळात लपायला जातो खरा. पण सुडाने पेटलेली चंद्रकांता तिथं जाऊन

दिग्दर्शनाने तिचा फज्जा उडविलेला ठायी ठायी दिसतो. कथेच्या मांडणीत कितीतरी विसंगती दिसून येतात. खरं तर चंद्रकांता ही राजपूत राजकन्या. पण तिची एन्ट्रीच मुळी दरबारातील एका परकीय विजेत्यासमोर नृत्य करताना होते. कुणालच्या प्रेमात आकंठ बुडून गेलेल्या चंद्रकांताला आपल्या पित्याच्या हत्येचा सूड

कोसळून पडेपर्यंत तिने नुसतं बघत राहणं कुणालाही न पटणारंच. भारतभूषणसारखा मवाळ व्यक्तिमत्त्वाचा नट कवी, प्रियकर म्हणून कितीही शोभून(!) दिसत असला तरी शेवटी हातात तलवार घेतलेला भारतभूषण पडद्यावर बघताना विदूषकापेक्षा वेगळा वाटत नाही. बीना रायचं देखणं व्यक्तित्व आणि तिचा वावर कितीही सहज असला तरी तिची मूळ व्यक्तिरेखाच चुकीची रेखाटल्यामुळे तिथंही रसभंग होतो. आपल्या तलवारबाजीमुळे चित्रपटात स्वतंत्र ठसा उमटविणारा हिरालाल त्यामानाने कितीतरी उजवा वाटू लागतो आणि स्वत:च्या धीरगंभीर व्यक्तिमत्त्वाने आश्रमातील गुरू साकारणारा बिपिन गुप्ता तर कायमचा लक्षात राहून जातो.

मात्र 'चंद्रकांता' म्हटल्याबरोबर सर्वप्रथम लक्षात येतं ते रफीचं 'मैने चाँद और सितारों की तमन्ना की थी' हे बहारदार सोलो. पडद्यावर दोन वेळा येणारं हे गाणं भारतभूषणच्या तोंडी असावं हे त्याचं भाग्य. मुळात ते देणारा संगीतकार एन्. दत्ता हा कोणी पहिल्या दर्जातला संगीतकार नव्हे. त्याला स्वतंत्र संगीतकारही व्हायचं नव्हतं. पण दादा बर्मनकडे सहाय्यक म्हणून काम करताना त्याच्यातील चुणूक गीतकार साहिरच्या लक्षात आली आणि त्यानेच एन. दत्ताला 'तू संगीतकार हो' असा लकडा लावला. मग देव आनंद-गीता बालीच्या 'मिलाप' (१९५५)ला स्वतंत्ररीत्या संगीत देऊन एन्. दत्ताने आपल्या कारकिर्दीचा शुभारंभ केला. अर्थात् त्याचीही गाणी साहिरच्याच ओजस्वी लेखणीतून उतरली होती. 'चंद्रकांता' हा तसा पोषाखीपट. त्यामुळे त्यात भव्य सेटस्, पात्रांचे उंची कपडे यांची रेलचेल होती. विशेषत: त्यातल्या क्लायमॅक्सला ज्या देवळात वीरजाल स्वत:चा जीव वाचविण्यासाठी जातो तिथला त्याचा स्वत:चा २० फूट उंचीचा बैठा पुतळा, त्यावर चढलेला वीरजाल आणि त्या पुतळ्याच्या पायथ्याशी उभी राहून तलवार उगारणारी चंद्रकांता ही दृश्य पाहताना थरारून जायला होतं. शिवाय सगळी जनता खवळल्यावर जेव्हा वीरजालच्या किल्ल्यावर चाल करून जाते तेव्हाचे मॉब सीन्सही धिटाईने घेतल्याचं जाणवतं. पण या साऱ्याचा एकूण परिणाम शेवटी शून्यच असतो. मध्यंतरी छोट्या पडद्यावर आलेली नीरजा गुलेरीची 'चंद्रकांता' ही मालिका चांगलीच गाजून गेली: ती याच कथेवर बेतलेली. पण १९५६ सालचा 'चंद्रकांता' मात्र पडलेच ठरला. एन्. दत्ताने दिलेली त्यातली इतर गाणीही कुणाच्या लक्षात राहिली नाहीत. मात्र रफीने गायलेले ते एकमेव दोन भागातले सोलो कधीही कानावर पडले की 'चंद्रकांता' हे नाव पुन्हा एकदा लक्षात येतं. त्या गीताचा कधी कुणाला विसर पडेल असं वाटत नाही. काळ कितीही पुढे गेला तरी साहिरचे ते जीवघेणे शब्द आळविणारा रफी आणि तशीच हळुवार सुरावट बांधणारा एन्. दत्ता आपल्याला पुन: पुन्हा आठवत राहतील.

■ विजय शिंगोर्णीकर